आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
५ नोव्हेंबर २०२६ - गुरूवार

ठळक बातम्या

- एमपीएससी परीक्षा पद्धती सुधारणा समितीचा अहवाल राज्य सरकारला सादर
- गोवत्स द्वादशीने दीपावलीच्या प्रकाश पर्वाला प्रारंभ
- अमेरिकेत मध्यावधी निवडणुकांमधे डेमोक्रॅट्सची सरशी/ इराण युद्धाचा परिणाम निवडणुकीवर झाल्याची ट्रंप यांची कबुली
- शेअर बाजारात चैतन्य, सेन्सेक्सची सोळाशेपेक्षा जास्त अंकानी झेप

आणि

- हॉकी आशियाई अजिंक्यपद स्पर्धेतला अंतिम सामना आज भारत आणि जपान यांच्यात रंगणार

<><><><><><>

महाराष्ट्रातल्या भरती परीक्षा पद्धतीतल्या सुधारणांसाठी स्थापन झालेल्या व्ही. राधा समितीनं आपला अंतरिम अहवाल राज्य सरकारला सादर केला आहे. या अंतरिम अहवालात राज्य लोकसेवा आयोगाच्या गट क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२६ मधली पदसंख्या ५ हजारांवरून १६ हजारांपेक्षा जास्त करण्याची शिफारस करण्यात आली आहे. तसंच विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार एक वेळची विशेष बाब म्हणून वयोमर्यादेत एक वर्षाची सवलत देण्याची शिफारस करण्यात आली आहे. १ जानेवारी २०२६ नंतर प्रसिद्ध झालेल्या मात्र निवड प्रक्रिया सुरू न झालेल्या सर्व जाहिराती, तसंच ३१ डिसेंबर २०२७ पर्यंत प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींसाठी वयोमर्यादेतली ही सवलत लागू राहील. या सवलतीमुळे गट-क परीक्षा २०२६ च्या अतिरिक्त पदांकरता पात्र ठरणाऱ्या उमेदवारांना संधी मिळावी यासाठी अर्ज प्रक्रिया पुन्हा एकदा सुरू करण्याची शिफारसही करण्यात आली आहे.

प्रश्नपत्रिका फुटण्याच्या घटना टाळण्यासाठी यापूर्वीची प्रश्नपत्रिका निर्मितीची कार्यवाही रद्द करून सुरक्षित प्रक्रियेद्वारे नव्याने प्रश्नपत्रिका तयार करणं, प्रश्नपत्रिका आणि ओएमआर उत्तरपत्रिकांची छपाई, साठवणूक, वाहतूक यासाठी कडक सुरक्षा व्यवस्था ठेवणं, परीक्षा

केंद्रांवर पोलीस बंदोबस्त, सीसीटीव्ही देखरेख, सिग्नल जॅमर आणि प्रशिक्षित मनुष्यबळाची व्यवस्था करणं अशा शिफारशी समितीने आपल्या अहवालात केल्या आहेत.

<><><><><><>

आज गोवत्स द्वादशी म्हणजेच वसुबारस. दिवाळीच्या सणाला आजपासून सुरुवात होत आहे. आजच्या दिवशी घराघरात सवत्स धेनु म्हणजेच गाय आणि वासराची प्रतीकात्मक पूजा केली जाते. आजपासून दीपोत्सवाला, फराळाला आणि नियमानुसार फटाक्यांच्या उत्सवाला सुरुवात होईल. प्रत्येक शहरातल्या बाजारपेठा तऱ्हेतऱ्हेचे कंदील, तोरणं, रांगोळ्या, कपडे, गृहोपयोगी वस्तू इत्यादींनी सजल्या आहेत. यंदा या सणावर दुष्काळाचं सावट असलं तरी प्रत्येक जण आपापल्या परीने दिवाळीचं स्वागत करताना दिसत आहे. स्थानिक उत्पादनांना प्रोत्साहन देणाऱ्या 'व्होकल फॉर लोकल' मोहिमेचा प्रभाव दिवाळीच्या बाजारपेठांमध्ये दिसून येत आहे. स्थानिक कारागिरांनी तयार केलेल्या हस्तनिर्मित आणि पर्यावरणस्नेही उत्पादनांना ग्राहकांची पसंती मिळत आहे.

दिवाळीनिमित्त ठिकठिकाणी संगीत नृत्य इत्यादी सांस्कृतिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

अमेरिकेतल्या मध्यावधी निवडणुकांच्या निकालांचा परिणाम म्हणून आज शेअर बाजारही वधारला आहे.

उत्तर प्रदेशात अयोध्येमध्ये आज, उद्या आणि परवाच्या रात्री दीपोत्सवाचं आयोजन केलं जाणार असून त्यासाठी तयारी सुरु आहे. यासाठी जगभरातून विशेष पाहुणे, लोकनियुक्त प्रतिनिधि, वरिष्ठ अधिकारी आणि मीडिया प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. उत्सवाची भव्यता जगभरात पोचवण्यासाठी अत्याधुनिक मीडिया केंद्र उभारण्यात येत आहे.

<><><><><><>

व्यापाऱ्यांची अखिल भारतीय संघटना सी ए आय टी ने विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांना पत्र लिहून दिल्लीत गेले महिनाभर सुरु असलेल्या राजकीय आंदोलनांमुळे व्यापारावर झालेल्या विपरीत परिणामांबद्दल संताप व्यक्त केला आहे. या पत्रात संघटनेने गांधी यांच्याकडून पाच प्रश्नाची उत्तरं मागितली असून व्यापाऱ्यांच्या नुकसानाची जबाबदारी कोण घेणार आहे याचीही विचारणा केली आहे. काँग्रेसच्या पाठिंब्याने सुरु असलेल्या या आंदोलनांप्रति निषेध व्यक्त करण्यासाठी व्यापाऱ्यांच्या संघटनेने देशव्यापी 'धिक्कार दिन'

पाळायचा निर्णय घेतला आहे. दिवाळीनंतर त्यांनी नवीदिल्लीत देशभरातल्या व्यापाऱ्यांची बैठक बोलावली असून त्यात या दिनाची तारीख ठरवण्यात येणार आहे.

<><><><><><>

अटक केलेल्या आरोपीला दंडाधिकाऱ्यांसमोर हजर करण्यासाठीची २४ तासांची घटनात्मक मुदत, त्याला ताब्यात घेतल्याच्या क्षणापासून सुरू होत असल्याचं आज सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केलं. राज्यघटनेच्या अनुच्छेद २२(२) अन्वये अटक आणि ताब्यात घेणं यात कोणताही कृत्रिम फरक करता येणार नाही. त्यामुळे अटकेपूर्वी ताब्यात ठेवलेल्या कालावधीला २४ तासांच्या मर्यादेतून वगळलं तर घटनात्मक तरतुदींचा भंग होईल, असं न्यायमूर्ती उज्ज्वल भुयान आणि न्यायमूर्ती अतुल चांदुरकर यांच्या खंडपीठानं स्पष्ट केलं. या मुदतीतून फक्त अटक केलेल्या ठिकाणापासून दंडाधिकारी न्यायालयापर्यंत पोहोचण्यासाठीचा वाजवी प्रवास वेळ वगळला जाऊ शकतो. त्यामुळे अटकेचा कालावधी परिस्थितीनुसार वाजवी आहे का, याचंही मूल्यमापन दंडाधिकाऱ्यांनी केलं पाहिजे आणि जर तो कालावधी जास्त असेल त्यांना कोठडी नाकारण्याचा अधिकार आहे, असंही न्यायालयानं नमूद केलं.

<><><><><><>

केंद्र सरकारने सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना चारा सुरक्षा, पशुधन विकास आणि संबंधित पायाभूत सुविधांच्या विकासासाठी विकसित भारत जी रामजी कायदा २०२५ अंतर्गत काम सुरु करण्याच्या सूचना दिल्या आहेत. केंद्र सरकारच्या ग्राम विकास विभाग तसेच पशुधन आणि दुग्धविकास व्यवसाय विभागाने संयुक्तपणे ही सूचना जारी केली आहे. लहान शेतकरी, पशुपालक आणि दुग्धव्यवसाय करणाऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होण्यासाठी विकसित भारत जी रामजी अंतर्गत २२ कामे निवडली असून त्याबद्दल कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

<><><><><><>

अमेरिकेतील मध्यावधी निवडणुकांमध्ये मतदारांनी अमेरिकन काँग्रेस आणि सिनेटची सूत्र डेमोक्रेटिक पक्षाकडे दिली आहेत. अमेरिकन काँग्रेसमध्ये डेमोक्रॅट्सच्या २५ जागा वाढल्या असून त्यांना ४३५ पैकी २२८ जागा मिळाल्या आहेत. तर सिनेटमध्ये डेमोक्रेटिक पक्षाच्या ७ जागा वाढल्यानं त्यांच्याकडे ११० पैकी ५४ जागा आल्या आहेत. निवडणुकीपूर्वी

या दोन्ही सभागृहात राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या रिपब्लिकन पक्षाकडे बहुमत होतं. या निवडणुकांमध्ये भारतीय वंशाच्या अनेक अमेरिकन उमेदवारांनी चांगली कामगिरी केली आहे.

दरम्यान, इराणबरोबर केलेल्या युद्धाचा परिणाम मध्यावधी निवडणुकांवर झाल्याचं अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी कबूल केलं आहे. मात्र, हा संघर्ष करणं अपरिहार्य होतं असंही ट्रम्प यांनी पत्रकार परिषदेत सांगितलं. इराणच्या बाबतीत जे करावं लागलं, ते आपल्या सरकारने केलं आणि यापुढंही करत राहू, असंही ते म्हणाले.

<><><><><>

इस्त्राएलला दरवर्षी दिली जाणारी ४ अब्ज डॉलर्सची मदत अमेरिका आता बंद करणार आहे. इस्त्राएलचे प्रधानमंत्री बेंजामिन नेतान्याहू यांच्याशी याबाबत समझोता झाल्याचं अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी सांगितलं. यावर्षाअखेरीनंतर ही मदत थांबणार असली, तरी आवश्यकता भासल्यास अमेरिका वेळोवेळी इस्त्राएलला मदत करेल असं ट्रंप यांनी एका मुलाखतीत सांगितलं. मात्र अद्याप इस्त्राएलकडून याला दुजोरा मिळाला नाही.

<><><><><>

जागतिक पातळीवर कच्च्या तेलाच्या किमतीत घट झाल्याच्या पार्श्वभूमीवर आज भारतीय शेअर बाजारांमध्ये वाढ दिसून आली. सकाळी व्यवहार सुरू झाले तेव्हा मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समध्ये सोळाशेपेक्षा जास्त अंकांची वाढ झाली आणि तो ७८ हजार ९००च्यावर गेला. राष्ट्रीय शेअर बाजाराच्या निफ्टीतही ४०० पेक्षा जास्त अंकांची वाढ दिसून आली आणि तो २४ हजार ३००च्यावर सुरू झाला.

<><><><><>

हॉकी आशियाई अजिंक्यपद स्पर्धेतला अंतिम सामना आज भारत आणि जपान यांच्यात रंगणार आहे. मोहाली इथल्या ऑलिम्पिकपटू बलबीर सिंग सीनियर आंतरराष्ट्रीय हॉकी स्टेडीयमवर संध्याकाळी सात वाजता सामना सुरू होईल. गतविजेत्या भारतानं काल झालेल्या उपांत्य फेरीत दक्षिण कोरियावर ८ विरुद्ध १ असा दणदणीत विजय मिळवून अंतिम फेरीतील आपलं स्थान निश्चित केलं, तर जपाननं मलेशियाविरुद्धच्या अत्यंत चुरशीच्या लढतीत विजय मिळवून अंतिम फेरीत प्रवेश केला.

<><><><><>

युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालयानं माय भारत पोर्टलवर 'खेलो भारत: उत्पादन ते पोडियम फिनिश ही प्रश्नमंजुषा सुरू केली आहे. ही प्रश्नमंजुषा नागरिक, विद्यार्थी, तरुण, व्यावसायिक आणि क्रीडाप्रेमींसाठी खुली असून, ती येत्या २० तारखेपर्यंत सुरू राहील. या उपक्रमाद्वारे देशातील क्रीडा साहित्य उत्पादन, नावीन्यपूर्ण उपक्रम आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील क्रीडा नैपुण्य यांचा समावेश असलेल्या क्रीडा परिसंस्थेबद्दल माहिती घेण्यास लोकांना प्रोत्साहित केलं जाणार आहे, असं क्रीडामंत्रालयानं म्हटलं आहे.

<><><><><><>

भारताची १७ वर्षीय टेनिसपटू माया राजेश्वरन रेवती हिनं डब्ल्यूटीए स्पर्धेतील एकेरी गटाच्या उपांत्यपूर्व फेरीत धडक मारली आहे. यापूर्वी फेब्रुवारी २०१२ मध्ये सानिया मिर्झानं पटाया खुल्या स्पर्धेत उपांत्यपूर्व फेरी गाठली होती. त्यानंतर अशी कामगिरी करणारी माया ही पहिली भारतीय टेनिसपटू ठरली आहे. मायानं चेन्नई खुल्या टेनिस स्पर्धेच्या दुसऱ्या फेरीत, पोलंडच्या वेरोनिका फाल्कोव्स्काचा पराभव केला.

<><><><><><>

केंद्रीय निवडणूक आयोगाने काही राज्य आणि केंद्रशासित प्रदेशातल्या मतदारयाद्यांच्या विशेष पुनरिक्षण मोहिमेचा कार्यक्रम जाहीर केला आहे.

अरुणाचल प्रदेश, ओदिशा, मिझोरम, आणि सिक्कीम या राज्यांमधे तसंच चंडीगढ, दादरा-नगरहवेली-दीव-दमण या केंद्रशासित प्रदेशांमधे ही मोहीम राबवली जाणार असून त्याकरता १ जानेवारी २०२७ हा पात्रता दिनांक ठरवला आहे. येत्या २० नोव्हेंबरपर्यंत मतदान केंद्रांचं सुसूत्रीकरण आणि फेररचना पूर्ण होईल. आणि ३० नोव्हेंबरपर्यंत प्रारूप मतदारयाद्या प्रसिद्ध केल्या जातील. ३० डिसेंबरपर्यंत हरकती आणि सूचना नोंदवता येतील. १८ जानेवारी पर्यत त्या निकाली काढल्या जातील. २१ जानेवारी २०२७ रोजी अंतिम मतदारयादी प्रसिद्ध केली जाईल.

//<><><><><><>//